| CNR NO:MHAM170005152018 | संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक २०५/२०१८ | | | |
|---|---|---|---|---|
| | दाखल तारीख | :- | ३०.०८.२०१८ | |
| | नोंदणी तारीख | :- | ३०.०८.२०१८ | |
| | निकाल तारीख | :- | ०३.०७.२०२६ | |
| | कालावधी | :- | वर्ष | महिना | दिवस |
| | | | ०७ | १० | ०४ |
| | निशानी क्रमांक | :- | १८ | |

**फॉर्म क्रमांक ३२**
**भाग अ**
**न्यायनिर्णय**
**[फौजदारी मार्गदर्शिका, प्रकरण ६, परिच्छेद ४४ (i)]**

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, तिवसा, ता. तिवसा,**
**जिल्हा – अमरावती यांचे न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी रोहिणी वि. मनोरे)**
**न्यायनिर्णय**
**(घोषीत दिनांक ०३.०७.२०२६)**
**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.२०५/२०१८**
**सरकार विरूध्द जगदीश जानराव रिठे**
**अपराध क्रमांक १४४/२०१८ पोलीस स्टेशन, तिवसा**

| | |
|---|---|
| फिर्यादी | महाराष्ट्र शासन मार्फत पोलीस स्टेशन अधिकारी, पोलीस स्टेशन, तिवसा, ता. तिवसा, जिल्हा – अमरावती. |
| अभियोग पक्षातर्फे वकील | **कु. एल. टी. गेडाम,** विद्वान सरकारी अभियोक्ता |
| आरोपी | **जगदीश जानराव रिठे,**<br>वय – ५६ वर्ष, व्यवसाय – शेती,<br>रा. पालवाडी,<br>ता. तिवसा, जि. अमरावती. |
| आरोपीतर्फे अधिवक्ता | **विद्वान विधिज्ञ श्री. व्ही. पी. तागडे.** |

## भाग ब

## [फौजदारी मार्गदर्शिका, प्रकरण ६, परिच्छेद ४४ (ii)]

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | ११.०७.२०१८ |
| प्रथम खबरी अहवालाचा दिनांक | १५.०७.२०१८ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | ३०.०८.२०१८ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | २२.०५.२०२४ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | ०१.०३.२०२५ |
| न्यायनिर्णय राखुन ठेवल्याची तारीख | लागु नाही. |
| न्यायनिर्णय घोषीत तारीख | **०३.०७.२०२६** |
| शिक्षा दिली असल्यास ती तारीख | लागु नाही. |

## आरोपीचा तपशील

| आ. क्र. | आरोपीचे नांव | अटक केल्याचा दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | आरोप केलेला गुन्हा | निर्दोष मुक्तता किंवा दोषी | सुनावण्यात आलेली शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ नुसार संपरीक्षे दरम्यान आरोपी न्यायबंदी असलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | जगदीश जानराव रिठे | २४.०७. २०१८ | २४.०७. २०१८ | भा.दं.वि.१८६० चे कलम २७९ व ३०४–अ व मोटर वाहन कायदा, १९८८ चे कलम ३/१८१, १४६/१९६ | निर्दोष मुक्तता | लागु नाही | लागु नाही |

## न्यायनिर्णय
## (पारीत दिनांक ०३.०७.२०२६ )

आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान, १८६० चे कलम २७९ व ३०४–अ (थोडक्यात 'भा.दं.वि.,१८६०') व मोटर वाहन कायदा, १९८८ चे कलम ३/१८१, १४६/१९६ अंतर्गत शिक्षेस पात्र असलेल्या गुन्हयांकरीता संपरिक्षा चालविण्यात आली.

**अभियोग पक्षाचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे आहे.**

२. दिनांक ११.०७.२०१८ रोजी दुपारी १ः०० वाजताच्या दरम्यान फिर्यादीचे पती हे आठवडी बाजारकडुन हायवे रोड क्रमांक ६, तिवसा येथुन रोड क्रास करुन जात असतांना आरोपीने त्याच्या ताब्यातील पॅशन प्रो वाहन क्रमांक एमएच–२७–एएन–९२०२ विमा नसलेले वाहन व वाहन चालविण्याचा परवाना नसतांना वाहन भरधाव वेगाने व हलगर्जीपणे चालवुन पायदळ जाणारे फिर्यादीचे पती मृतक हफिज शहा हसन शहा याला ठोस मारुन जखमी केले. जखमी हा इलाजादरम्यान इर्विन हॉस्पीटल दवाखना, अमरावती येथे मरण पावले. म्हणुन, सदरच्या घटनेवरुन फिर्यादीने आरोपीविरुध्द पोलीस स्टेशन, तिवसा येथे फिर्याद नोंदविली.

३. फिर्यादीच्या तक्रारीवरुन पोलीस स्टेशन, तिवसा येथे आरोपीविरुध्द गुन्हा क्रमांक **१४४/२०१८** नुसार भारतीय दंड विधान, १८६० चे कलम २७९ व ३०४–अ नुसार गुन्हा नोंदविण्यात आला. त्याचा तपास सहायक पोलीस उपनिरीक्षक श्री. धुलंदरे,

ब. नं. ३२१ यांनी केला. त्यांनी घटनास्थळावर जाऊन पंचांसमक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला. आरोपीला अटक केली. साक्षीदारांचे बयाण नोंदविले. वैद्यकीय अधिकारी यांच्याकडुन वैद्यकीय अहवाल प्राप्त केला. तपास पुर्ण करुन तपासी अधिकारी यांनी न्यायालयात आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान, १८६० चे कलम २७९ व ३०४–अ व मोटर वाहन कायदा, १९८८ चे कलम ३/१८१, १४६/१९६ दोषारोपपत्र दाखल केले.

४. संपरीक्षेदरम्यान आरोपीविरुध्द निशाणी क्रमांक १२ नुसार दोषारोप निश्चीत केला. सदरचा दोषारोप हा आरोपीला मराठी भाषेमध्ये वाचुन व समजावुन सांगीतला. आरोपीने तो नाकबुल असल्याचे सांगीतले व खटला पुढे चालविण्याची मागणी केली.

५. आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द करण्याकरीता अभियोग पक्षाने एक साक्षीदार तपासला. निशाणी क्रमांक १ वरील आदेशान्वये अभियोग पक्षाचा पुरावा त्यांच्या विनंतीवरुन बंद करण्यात आला. आरोपीचे फौजदारी प्रक्रीया संहिता, १९७३ चे कलम ३१३ (१)(ब) अन्वये निवेदन (नि.क्र.१७) प्रमाणे नोंदविण्यात आले.

६. अभियोग पक्षातर्फे विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता कु. एल. टी. गेडाम व आरोपीतर्फे विद्वान वकील श्री. व्ही. पी. तागडे यांचा युक्तीवाद ऐकला.

७. विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता तसेच आरोपीचे विद्वान विधीज्ञ यांनी केलेल्या युक्तीवादावरुन खालील मुद्दे न्यायनिवाडा करण्याकरीता माझ्या पुढे उद्भवले. त्यांचे सकारण निष्कर्ष व कारणमिमांसा मी खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन क्रमांक एमएच–२७–एएन–९२०२ हे वाहन हयगयीने व निष्काळजीपणे, मानवी जिवीतास धोका होईल अशा प्रकारे चालवुन फिर्यादीचे पती नामे हफिज शहा हसन शहा यांना धडक देऊन जखमी केल्यामुळे भा.दं.वि.,१८६० चे कलम २७९ प्रमाणे गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | **नाही.** |
| २. | आरोपीने त्याचे ताब्यातील वाहन हयगयीने व बेदरकारपणे चालवून फिर्यादीचे पती नामे हफिज शहा हसन शहा यांच्या मृत्युस कारणीभूत ठरुन भा.दं.वि.,१८६० चे कलम ३०४–अ प्रमाणे गुन्हा केला आहे काय? | **नाही.** |
| ३. | आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन विना परवाना चालवुन मोटर वाहन कायदयाचे कलम ३/१८१ प्रमाणे गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | **नाही.** |

| | | |
|---|---|---|
| ४. | आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन विमा न काढता चालवुन मोटर वाहन कायदयाचे कलम १४६/१९६ प्रमाणे गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | **नाही.** |
| ५. | आदेश काय ? | **अंतीम आदेशाप्रमाणे आरोपीची निर्दोष सुटका करण्यात येते.** |

## कारणमिमांसा

**मुद्दे क्रमांक १ ते ४ करीता –**

८. वरील सर्व मुद्दे एक सारख्या पुराव्यावर आधारीत असल्यामुळे पुराव्याची व तथ्यांची पुनरावृत्ती टाळण्याकरीता त्यांचे विवेचन एकत्रीतपणे करण्यात येत आहेत. आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्याकरीता अभियोग पक्षाने फिर्यादी म्हणुन साक्षीदार क्रमांक १ शकीला बी (नि.क्र.१४) यांना तपासले. साक्षीदार क्रमांक १ शकीला बी (नि.क्र.१४) हिने तिच्या पुराव्यादरम्यान मयत हफिज शहा हे तिचे होते असे तिने सांगीतले. तिला लिहता वाचता येत नसुन घटना ही दिनांक ११ जुलै रोजी साधारणतः दहा वर्षापुर्वी घडल्याचे तिने सांगीतले. तिचे पती घरकुल योजनेसाठी आधारकार्ड घेऊन जुनी ग्राम पंचायत, तिवसा येथे गेल्याचे तिने सांगीतले. घटनेच्या दिवशी प्रविण दुर्गे हा तिच्या घरी आला होता व त्याने सांगीतले की, तिच्या पतीचा अपघात झाला

आहे असे तिने तिच्या पुराव्यादरम्यान सांगीतले. ति सरकारी दवाखना तिवसा येथे गेली असता तिचे पती बेशुध्द अवस्थेत असल्याचे तिने सांगीतले. तेथुन तिच्या पतीला अमरावती येथील इर्विन दवाखन्यात येथे भरती केले व उपचारा दरम्यान तिचे पती मयत झाल्याचे तिने सांगीतले. आरोपीच्या दुचाकी वाहनाच्या धडकेने तिचे पती मरण पावल्याचे तिने सांगीतले. तिने आरोपीविरुध्द फिर्याद (नि.क्र.१५) व प्रथम खबरी अहवाल (नि.क्र.१६) नोंदविल्याचे सांगीतले.

९. साक्षीदार क्रमांक १ शकीला बी (नि.क्र.१४) हिने तिच्या उलटतपासादरम्यान मान्य केले की, अपघात झाला त्या दिवशी ती तिच्या घरी असल्यामुळे अपघात कुठे, कसा आणि किती वाजता झाला हे तिला माहित नाही. तसेच तिचे शिक्षण झाले नसल्यामुळे तिला लिहीता व वाचता येत नसल्याचे तिने मान्य केले. फिर्याद दिल्याची तिला तारीख आठवत नसुन तिच्या पतीचा अपघात झाल्यानंतर १३ तारखेला पोलीस तिच्या घरी आले व तिने १३ तारखेला पोलीस स्टेशनला जाऊन रिपोर्ट दिल्याचे मान्य केले. तिने हे देखिल स्पष्टपणे मान्य केले की, तिला लिहीता वाचता येत नसल्यामुळे पोलीसांनी तिच्या जबाबात काय लिहीले हे तिला माहित नाही. तिने हे देखील मान्य केले की, तिच्या पतीचा अपघात हा दुचाकी वाहनाने झाला असुन त्याचा क्रमांक व दुचाकी वाहन कोणत्या कंपनीचे होते हे देखील आठवत नाही. तिने हे देखील मान्य केले

की, घटनास्थळी ती हजर नसल्यामुळे अपघात कोणत्या वाहनाने झाला व कोणाद्वारे झाला हे तिला माहित नाही. तिने हे देखील स्पष्टपणे मान्य केले की, आरोपीचे तिला नाव माहित नसल्याने पोलीसांनी सांगितल्याप्रमाणे तिने आरोपीचे नाव फिर्यादमध्ये नमुद केले व पोलीसांच्या सांगण्याप्रमाणे तिने आरोपीविरुध्द रिपोर्ट दिला.

१०. सदरहु साक्षीदाराच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, सदर साक्षीदार हा घटना घडली तेव्हा घटनास्थळी हजर नसल्याने अपघात कसा व कोणत्या वाहना द्वारे व कोणा द्वारे घडला हे बाबत तिला काहीही माहीती नसल्याचे तिने सांगीतले. तसेच सदरहु साक्षीदार हा आरोपीला ओळखत नसल्याचे तिने मान्य केले आहे. सदरहु साक्षीदाराला तपासुन अभियोग पक्ष हा तथाकथीत अपघात हा आरोपीने केला हे सिध्द करु शकले नाही.

११. आरोपीविरुध्द संशयापलीकडे गुन्हा सिध्द करण्याची जबाबदारी ही पुर्णपणे अभियोग पक्षावर असते. अभियोग पक्षाला वारंवार साक्षीदार तपासण्याकरीता संधी देण्यात आली. परंतु, अभियोग पक्षातर्फे वैद्यकीय अधिकरी, तपासी अधिकारी व इतर कुठलाही साक्षीदार तपासण्यात आला नाही. अभियोग पक्षाकडुन तपासण्यात आलेल्या साक्षीदारांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, तिने अभियोग पक्षाला

आरोपीविरूध्द गुन्हा सिध्द करण्यामध्ये कुठलीही मदत केलेली नाही. अभियोग पक्ष हा आरोपीविरूध्द घटनास्थळ पंचनामा सिध्द करून घेण्यासही अपयशी ठरला आहे. अभियोग पक्षाने तपासलेल्या साक्षीदाराने आरोपी हा सदरहु वाहन हे भरधाव वेगाने व बेदरकारपणे चालवित असल्याबाबत, फिर्यादीचे पती हफिज शहा हसन शहा यांच्या मृत्युस कारणीभुत ठरल्याबाबत व सदरहु वाहन विना परवाना व विना विमा उतरविता चालविल्याबाबत कुठलाही सबळ व विश्वसनीय पुरावा दिलेला नाही.

**१२.** अभिलेखावर दाखल असलेल्या पुराव्याच्या आधारे हे न्यायालय या निष्कर्षावर पोहोचत आहे की, अभियोग पक्ष हा आरोपीविरुध्द सबळ व पुरेसा पुराव्याअभावी भारतीय दंड विधान, १८६० चे कलम २७९ व ३०४–अ व मोटर वाहन कायदा, १९८८ चे कलम ३/१८१, १४६/१९६ नुसारचा दोषारोप संशयापलीकडे सिध्द करण्यास पुर्णपणे अपयशी ठरलेला आहे. अशा परीस्थीतीत आरोपी हा निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. **त्यामुळे सदर न्यायालय मुद्दे क्रमांक १ ते ४ चे उत्तर नकारार्थी देत आहे.**

<u>**मुद्दा क्रमांक ५ करीता –**</u>

**१३.** अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द कोणत्याही प्रकारचा सबळ, विश्वसनीय, पुरेसा व संशयाच्या पलीकडचा पुरावा सादर केला नाही. त्यामुळे सदर खटल्यातुन

आरोपीला निर्दोष मुक्त करणे योग्य होईल, असे दिसुन येते. सदरहु प्रकरणात कोणताही मुद्देमाल जप्त नसल्यामुळे त्याच्या विल्हेवाटीबाबत कोणताही आदेश पारीत नाही.

**सदर न्यायालय मुद्दा क्रमांक ५ च्या अनुषंगाने खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.**

## आदेश

१. आरोपी **जगदीश जानराव रिठे**, वय– ५६ वर्षे, व्यवसाय– शेती, राहणार – पालवाडी, ता. तिवसा, जि. अमरावती. याची प्रस्तुत खटल्यातुन भारतीय दंड विधान, १८६० चे कलम २७९ व ३०४–अ व मोटर वाहन कायदा, १९८८ चे कलम ३/१८१ व १४६/१९६ अन्वयेच्या गुन्हयांमधुन फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २५५ (१) नुसार निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचा वैयक्तीक जात मुचलका व जामीन कदबा रद्द करण्यात येतो.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७–अ नुसार रक्कम रुपये १५०००/– चा वैयक्तीक जात मुचलका व जामीन कदबा दयावा.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात अधिघोषीत करण्यात आला).**

स्वा/–
**(रोहिणी वि. मनोरे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, तिवसा,
ता. तिवसा, जि. अमरावती.

दिनांक : **०३.०७.२०२६.**
स्थळ : **तिवसा**

संं. फौ.ख.क्र. २०५/२०१८
शासन वि. जगदीश जानराव रिठे
न्यायनिर्णय (नि. क्र. १८)

**भाग क**

**[फौजदारी मार्गदर्शिका, प्रकरण ६, परिच्छेद ४४ (iii)]**

**अभियोग पक्षाच्या साक्षीदारांची यादी/बचाव/न्यायालयाचे साक्षीदार**

**अ. अभियोग :–**

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| साक्षीदार क्रमांक १ | शकीला बी हफिज शहा (नि.क्र.१४) | फिर्यादी. |

**ब. बचाव साक्षीदार :–**

| श्रेणी | नांव | पुराव्याचे स्वरूप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क. कोर्ट साक्षीदार :–**

| श्रेणी | नांव | पुराव्याचे स्वरूप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

## अभियोग पक्षाचे/बचाव/कोर्ट निशाणी

**अ. अभियोग :–**

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | स्वरुप |
|---|---|---|
| १. | नि.क्र.१५/सा.क्र. १ | फिर्याद |
| २. | नि.क्र.१६/सा.क्र. १ | छापिल प्रथम खबरी अहवाल. |

**ब. बचाव :–**

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क. कोर्ट निशाणी :–**

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**ड. मुद्देमाल :–**

| अनुक्रमांक | मुद्देमाल क्रमांक | स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

स्वा/–
**(रोहिणी वि. मनोरे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, तिवसा,
ता. तिवसा, जि. अमरावती.

दिनांक : **०३.०७.२०२६.**
स्थळ : **तिवसा**

**CERTIFICATE**

"I affirm that the contents of this P.D.F. file judgment are same word to word, as per original Judgment."

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | **Vijay K. Kaware** |
| Name of Court | : | Civil and Criminal Court, Teosa |
| Judgment dictated on | : | 03.07.2026 |
| Transcript ready on | : | 03.07.2026 |
| Judgment Signed by Presiding Officer on | : | 03.07.2026 |
| Judgment uploaded on | : | 03.07.2026 |